**<u>कि. फौजदारी अर्ज क्र. ४१२/२०२२</u>**
**निर्मला कापरे वि. सोमनाथ कापरे व इतर**
**नि. ०५ वर आदेश**
**(दि. १२ मार्च २०२६ रोजी पारीत)**

सदरचा अर्ज अर्जदाराने कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण प्रतिबंधक कायदा, २००५ चे कलम–२३ अन्वये अंतरीम खावटीची रक्कम मिळण्याकरीता सादर केला आहे व त्याप्रमाणे प्रार्थना करुन अर्ज मंजूर होण्याची विनंती केली आहे.

**२.** गैरअर्जदारांनी अंतरिम पोटगीच्या अर्जाला नि. क्र. १५ अन्वये लेखी जबाब दाखल करुन त्यांचे परस्पराशी असलेले नातेसंबंध मान्य करुन इतर बाबी अमान्य करुन असे नमुद केले आहे की, अर्जदार हिने अर्जातील कथने फक्त खोटे व काल्पनीक स्वरुपाचे असुन अर्जदाराने ही स्वतःच्या मर्जीने गैरअर्जदार यांचा त्याग केलेला आहे व माहेरी निघुन गेली आहे व आजतागायत गैरअर्जदार यांनी अनेक प्रयत्न करुनही नांदण्यास आलेली नाही. तसेच, सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

**४.** अर्जदाराच्या व गैरअर्जदारांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** अर्जदारांचा अर्ज पाहता खालील मुद्दे या न्यालयाच्या विचारासाठी उपस्थित झाले आहे. त्यावर निष्कर्ष हया न्यायालयाने खालील नमुद कारणमीमांसाच्या आधारावर नोंदविला आहे.

| अं.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार हे अंतरीम खावटी मिळण्यास पात्र आहे काय, असल्यास किती ? | : | **<u>अंशतः होकारार्थी.</u>** |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | आदेश काय ? | : | <u>**अंतिम आदेशाप्रमाणे.**</u> |

**– कारणमिमांसा –**

**७.** <u>**मुद्दा क्र.१ करीताः–**</u> अर्जदारांनी त्यांची मागणी सिध्द करण्यासाठी छापील प्रथम खबर ची प्रत, अर्जदार यांचे वैद्यकीय दाखले, प्रतिज्ञालेखाची प्रत तसेच अर्जदार व त्यांच्या दोन मुलांच्या आधारकार्डची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. तसेच, अर्जदार यांनी निशाणी क्र. १२ लगत मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र दाखल केले आहे.

**७.** प्रस्तुत प्रकरणाची पाहणी केली. उभयपक्षातर्फे परस्परातील नातेसंबंध नाकारण्यात आलेले नाहीत. तसेच अर्जदार हया त्यांच्या माहेरी राहत असल्याबाबतची बाब देखील नाकारण्यात आलेली नाही. अर्जदारांचा सांभाळ करण्याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी देखील गैरअर्जदारवर आहे.

८. कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, २००५ या अधिनियमाचे कलम–२३ प्रमाणे;

**अंतरीम किंवा एकतर्फी आदेश देण्याचा अधिकारः—**

(१) या अधिनियमान्वये होणाऱ्या कोणत्याही सुनावणी दरम्यान न्यायदंडाधिकारी, त्यांना जसे वाटेल, तसे अंतरीम आदेश देवू शकतात.

(२) जर न्यायदंडाधिकारीचे सकृतदर्शनी समाधान झाले असेल की प्रतिवादीने कौटूंबिक हिंसाचार केला किंवा करीत आहे किंवा प्रतिवादी कौटूंबिक हिंसाचार करण्याची शक्यता आहे तर विहीत नमुन्यातील शपथपत्राच्या आधारावर ते एकतर्फी आदेश देवू शकतात.

**९.** या कलमाच्या वाचनावरुन असे स्पष्ट होते की, कौटूंबिक हिंसाचाराची वागणुक घडल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाल्यास अर्जदाराला अंतरीम खावटी मंजूर करता येईल. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिज्ञालेखावर दाखल केलेला आहे. अर्जदार कथन करते त्याप्रमाणे तिच्यासोबत हिंसाचार झाला किंवा नाही, हयाबाबी अंतीम पुराव्याव्दारे सिध्द व स्पष्ट होणाऱ्या आहेत. प्रथमदर्शनी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिज्ञालेखावर दाखल केलेला असून कोणतीही स्त्री संयुक्तीक कारणाशिवाय तिच्या माहेरी राहत नाही, असे वाटत नाही.

**१०.** वरील चर्चेवरुन अर्जदाराविरुध्द कौटूंबिक हिंसाचार घडल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे. तसेच, जेव्हापासुन अर्जदार हया त्यांच्या माहेरी राहत आहे, तेव्हापासून गैरअर्जदार यांनी त्यांना नांदविण्याविषयी कोणतेही पाऊल उचलल्याचे दिसून येत नाही.

**११.** गैरअर्जदाराने प्रस्तुत प्रकरणामध्ये विवाह अर्ज क्र. २४/२०२२ मधील दि. ०६/०१/२०२३ रोजी मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ट स्तर पुणे यांनी पारित केलेला अंतरिम पोटगीच्या अर्जावरील आदेशाची प्रत दाखल केलेली असुन सदर विवाह अर्जाच्या कामी जाबदेणार हिस म्हणजेच प्रस्तुतची अर्जदार हिला रक्कम रु.५०००/– दरमहा पोटगी दिल्याचे दिसुन येते. सबब, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या महत्वपुर्ण निकालांचा निष्कर्ष लक्षात ठेवुन सदर अर्जदारास मिळणारी पोटगी या अर्जाच्या कामी मिळणा–या पोटगीतुन वजावट करुन अर्जदार मिळण्यास पात्र राहिल.

**१२.** गैरअर्जदाराचा स्वतःच्या मालकीचा केटरिंगचा व्यवसाय असुन सदर व्यवसायातुन प्रतिमहा अंदाजे रक्कम रु. ३,००,०००/– उत्पन्न मिळतक. तसेच गैरअर्जदार यांच्या मालकीचे १ रिक्षा व २ मोटार सायकल असुन त्या धंद्यातुन त्यांना प्रतिमहा रक्कम रु. ३०,०००/– उत्पन्न मिळते. तसेच चारचाकी व पिकअप असुन,

त्यामधुन त्यांना प्रतिमहा रक्कम रु. १,५०,०००/– उत्पन्न मिळते. परंतु गैरअर्जदार यांच्या उत्पन्नाबाबत कोणतेही दस्ताऐवज अभिलेखावर दाखल केले नाहीत. तसेच गैरअर्जदार यांचा कुठलाही उत्पन्नाचा दाखला अभिलेखवरती दाखल नाही. सबब, गैरअर्जदार हा सबळ मनुष्य या नात्याने रोजंदारीवरती दरदिवशी रक्कम रू. १०००/– कमवित असल्याचे गृहीत धरल्यास तो दरमहा रक्कम रू. ३०,०००/– ते ३१,०००/– कमवू शकतो. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदाराला खावटी देण्यास पात्र आहे. असे गृहीत धरल्यास ते चुकीचे ठरणार नाही.

**१३.** अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे त्या पुर्णतः उदरनिर्वाहासाठी गैरअर्जदारवर अवलंबुन आहेत. हल्लीच्या युगात दैनंदिन गरजा व जीवनाश्यक वस्तुचे भाव गगनचुंबी इमारतीसारखे वाढलेले दिसुन येते. या सर्व परिस्थितीमध्ये अर्जदाराला त्याच्या सर्व गरजा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच गैरअर्जदार हा पती या नात्याने तसचे मुलांची देखभालाची व पालनपोषणाची संपुर्ण जबाबदारी घेणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांना अंतरीम खावटी मंजुर करणे न्यायोचित होईल. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांना दोन मुले असल्याने व त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी म्हणजेच वैद्यकीय व शैक्षणिक विकासासाठी खर्चाची आवश्यकता आहे. सबब, गैरअर्जदार तिचा पिता या नात्याने या सर्व खर्चाची जबाबदारी त्याची असुन ती जबाबदारी पेलण्यास तो सक्षम असल्याचे दिसुन येते.

**१४.** सबब, अर्जदार व गैरअर्जदार यांची सामाजीक स्थिती व आर्थीक उत्पन्न, गरजा व वर केलेली चर्चा लक्षात घेता हे न्यायालय मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवित आहे. त्यामुळे विवाह अर्ज क्र. २४/२०२२ मधील मिळणारी पोटगी लक्षात घेवुन प्रस्तुत अर्जाच्या कामी अर्ज दाखल तारखेपासून गैरअर्जदारने अर्जदार

यास दरमहा रु.५,०००/- अंतरीम खावटी म्हणुन द्यावे.

**१५.** **मुद्दा क्र.२ करीताः-** मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष विचारात घेता मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | अर्ज दाखल तारखेपासून गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला दरमहा रु.५०००/- (अक्षरी-पाच हजार रुपये) अंतरीम खावटी म्हणून द्यावे. |
| ३. | अर्जदाराच्या इतर मागण्या फेटाळण्यात येत आहेत. |
| ४. | आदेशाची प्रत उभयपक्षांना विनामुल्य देण्यात यावी. |

CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR
Digitally signed by CHANDRAMOHAN MOHAN KHARKAR
Date: 2026.03.12 17:20:01 +0530

ठिकाण - शिरुर **(सी. एम. खारकर)**
दि. १२/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्या. क्र. ४)
घोडनदी, शिरुर, (MHPU20-3003)